ट्रॅंगल फॅक्टरीला लागलेली आग




लेखिका: होली लिटिलफ़ील्ड

चित्र: मैरी ओ'कीफ यंग

मराठी अनुवाद: तृप्ती कर्णिक

ट्रँगल फॅक्टरीला लागलेली आग





ट्रँगल फॅक्टरीला लागलेली आग

लेखकाचे मनोगत

१९०० च्या दशकात जगातील सर्वात जास्त कापडांच्या फॅक्टरी न्यूयॉर्कमध्ये होत्या. इथे काम करणाऱ्या कामगारांना रोज दहा तासांपेक्षा अधिक काम करावे लागे तेही आठवड्यातील सातही दिवस. इतके कष्ट करूनही त्याबदल्यात मिळणारा मोबदला अत्यंत अल्प असे. नुकतेच स्थलांतरित झालेले लोक इथे नोकरी करीत कारण त्यांना दुसरे काहीच काम मिळायचे नाही. त्यांच्या स्वत:च्या आणि कुटुंबियांच्या पोटापाण्यासाठी, निवाऱ्यासाठी त्यांना काम करणे भाग होते.

ह्या कंपन्यातील परिस्थिती अतिशय दयनीय आणि धोकादायक असायची. त्या काळी कामाच्या ठिकाणी कामगारांच्या सुरक्षिततेसाठी फारसे नियम अथवा कायदे अस्तित्वात नव्हते. कंपन्या अतिशय अस्वच्छ असत. अपुरा उजेड आणि अपुरी हवा अशा वातावरणात लोक दाटीवाटीने काम करीत. अनेक कंपन्या म्हणजे आगीचे सापळे होत्या. आपल्याल्या भरपूर पैसे मिळावे एवढ्यासाठीच फॅक्टरीचे मालक लक्ष घालत. तिथल्या कामगारांच्या सुरक्षितेतशी त्यांना काहीही देणेघेणे नव्हते.

न्यूयॉर्क शहरातील वॉशिंग्टन प्लेस आणि ग्रीन स्ट्रीटच्या कॉर्नरला ॲश इमारतीच्या ८ व्या, ९ व्या आणि १० व्या मजल्यावर **ट्रँगल शर्टवाइस्ट कंपनी** होती. ट्रँगल फॅक्टरीत काम करणाऱ्या ६०० कामगारांमध्ये बहुतांशी पूर्व युरोप, रशिया, इटली येथील स्थलांतरित महिला आणि मुली होत्या. तिथे महिलांचे फॅन्सी ब्लाउज (ज्याला शर्टवाइस्ट म्हणतात) बनवले जात.

पातळ सुती कापड किंवा लिननच्या कापडापासून ब्लाउज बनवले जायचे. कागदापेक्षाही लवकर जळेल इतके नाजूक असे हे साहित्य होते. असे असूनही कंपनीच्या मालकांनी इथे आग लागू नये ह्यासाठी काहीच काळजी घेतली नव्हती. शिवणयंत्रासाठी लागणाऱ्या तेलाची मोठाली पिंप अशीच कापडाच्या चिंध्यांच्या ढिगाजवळ ठेवलेली असायची. पटकन पेट घेऊ शकेल अशा वायरी छतावरून हवेत लोंबकळत असायच्या. त्याच्या जवळपास कामगारांना धूम्रपान करायची परवानगी होती. कधीही फायर ड्रील घेतले जायचे नाही. त्या इमारतीत असलेले एकमेव अग्नी प्रतिरोधक खूप जुने, फुगलेले आणि अतिशय धोकादायक होते. तेही असेच कधीचे दुसऱ्या मजल्यावर अडकून पडले होते. कामगारांनी त्याविरुद्ध अनेकवेळा तक्रार केली होती. सुरक्षिततेसाठी काही उपाययोजना कराव्यात ह्यासाठी संपही पुकारला होता. त्याचा काहीही उपयोग झाला नाही. फायर इन्स्पेक्शनमध्ये दरवेळी इमारत अग्नी प्रतिरोधक आहे असा रिपोर्ट मिळायचा.

शनिवार दि. २५ मार्च १९११ रोजी ट्रँगल फॅक्टरीच्या ८ व्या मजल्याला आग लागली होती. त्या आगीत अडकलेल्या दोन मुलींची ही गोष्ट आहे. पात्रे काल्पनिक असली तरी प्रत्यक्ष घडलेल्या घटनेतून जे वाचले त्यांनी सांगितलेल्या अनुभवावर आधारित ही गोष्ट आहे.



२५ मार्च १९११,

मिनी लेविन घरातून भरभर जिना उतरून पळतच रस्त्याला लागली. न्यूयॉर्क शहरात लवकरच वसंताचे आगमन होणार होते. पण तरीही अजून थंडीचा कडाका कमी झाला नव्हता. मिनी आज थोडं आधीच निघाली. सूर्य अजून उगवायचा होता. गार पडलेले हात चोळले आणि अजून थोडी ऊब येण्यासाठी जमेल तेवढं ती भराभर पावलं उचलत होती.



रस्ता पूर्ण मोकळा होता.

आजूबाजूची दुकानं बंद होती.

आज शनिवार. ज्यू लोकांच्या शबाथ-आठवड्याच्या प्रार्थनेचा दिवस होता.



मिनीच्या आजूबाजूला राहणाऱ्या बऱ्याचशा लोकांचा आज आरामाचा दिवस.

परंतु अनेक कारखान्यांना मात्र शनिवारी सुट्टी नसायची.

मिनी ट्रँगल शर्टवाईस्ट कंपनीत नोकरी करायची. वेगवेगळ्या फॅशनचे लेडीज ब्लाउज तिथे बनवले जायचे.

मिनी दहा वर्षांची असल्यापासून इथे कामाला येत होती.

सुरुवातीला तिला तयार ब्लाउजचे राहिलेले धागे कापण्याचं काम दिलं होतं.

खरंतर तिच्या वयाच्या मुलांना कारखान्यात काम करायला कायद्याने बंदी होती.

त्यामुळे जेव्हा तपासणी अधिकारी यायचे, तेव्हा मिनी आणि तिच्या वयाच्या मुलांना कपड्याच्या ढिगामध्ये लपवून ठेवलं जाई.

मिनी आणि तिची जिवलग मैत्रीण टेसा नेहमी एकाच ढीगात लपायाच्या.


इनस्पेक्टरने जर पकडलं तर नोकरी जायची भीती होती.

आता मिनी १४ वर्षांची झाली होती.

त्यामुळे तिला आता इनस्पेक्टर आल्यावर लपून बसायची गरज नव्हती.

आता तिला बढतीही मिळाली होती.


ती आणि टेसा दोघीनाही आता शिवणयंत्रावर काम मिळाले होते.




त्यांना बरोबर सकाळी ७:१५ ला कामावर पोचावे लागे.

कधीकधी संध्याकाळचे ५ वाजून गेले, १० तास उलटून गेले तरी सुट्टी मिळायची नाही.

ट्रँगल फॅक्टरी वॉशिंग्टनन प्लेस आणि ग्रीन स्ट्रीटच्या कॉर्नरला होती.





घरापासून फॅक्टरी बरीच लांब होती.

पण मिनीला चालत जायलाच आवडायचं.

त्यामुळे टेसाबरोबर भरपूर गप्पा मारता यायच्या.

टेसाबरोबरची मैत्री जर तिच्या बाबांना कळली तर मात्र काही तिचं खर नव्हतं.

कारण बाबा पोलंडमध्ये वाढले होते. तिथे एक ज्यू मुलगी कॅथोलिक मुलीची मैत्रीण अशी कल्पना देखील शक्य नव्हती.

अमेरिकेत गोष्टी वेगळ्या आहेत हे काही केल्या तिच्या वडिलांना कळत नव्हतं.



मिनी टेसा राहते त्या गल्लीकडे वळाली.

टेसाच्या इटालियन शेजाऱ्यांकडे रविवार पवित्र दिवस मानला जाई.

इथे दुकानं उघडी होती.

रस्त्यावर कामावर जाणाऱ्या लोकांची गडबड चालू होती.

टेसा घराच्या बाहेर मिनीची वाट पाहत थांबली होती.

मिनीला पाहिल्यावर टेसा हसली.

“मला वाटलं होतं तू आज इकडे येणार नाहीस,” टेसा म्हणाली. “कसली थंडी आहे आज! मला वाटलं की तू आज ट्राम पकडशील.”

“छे बाई,“ मिनी उत्तरली. “मला बाबा तुझ्यासोबतच जायला आवडतं.”

दोघीजणी लिफ्टने नवव्या मजल्यावरच्या फॅक्टरीत पोचल्या.

त्यांनी आपले कोट काढून ठेवले आणि कामाच्या खोलीत शिरल्या.


बरोबर ७:३० ला पॉवर चालू व्हायची.

आणि शिवणयंत्राचा घर्र-सर्र आवाज सुरु व्हायचा. जणू काही महाकाय पोळ्यातला मधमाशा घोंघावताहेत असा.

त्या प्रचंड आवाजामध्ये मिनी आणि टेसाला जर एकमेकांशी बोलावसं' वाटलं तर ओरडूनच बोलावं लागलं असतं.

अर्थात तशी वेळ येण्याचा प्रश्नच नव्हता आली कारण तिथे आपसात बोलायला परवानगी नव्हती.

त्या मोठ्या खोलीत ओळीने टेबलं मांडली होती. प्रत्येक टेबलावर शिवणयंत्र ठेवलं होतं. शिवणयंत्र चालवणाऱ्या मुली आणि बायका एकमेकांच्या शेजारी रांगेत बसत. त्या खोलीत इतकी दाटीवाटी असायची की काम करताना सारखं खांद्याला नाहीतर हाताला दुसरीचा खांदा-कोपर लागायचा.



जमिनीवर सगळीकडे कापडाचे तुकडे आणि ब्लाउजचे पॅटर्न पसरलेले असायचे. पूर्ण झालेलं काम छताला टांगलेलं असायचं.

शिवणयंत्राचं तेलं सगळीकडे सांडलेलं असायचं. सगळ्यांना माहित होतं की त्यामुळे कधीही आग लागू शकते.

मिनी काम करायला लागल्यापासूनच दोनदा आग लागली होती.

त्यानंतर काही कामगारांनी मागणी केली होती की ह्या अडचणी दूर केल्याशिवाय ते काम करणार नाहीत.

मालकांनी सुरक्षितेचे उपाय राबवण्याचे आश्वासन दिले होते परंतु त्याची कधीही अंमलबजावणी झाली नाही.



मिनी खूप काळजीपूर्वक काम करायची.

कारण थोडं जरी लक्ष इकडे तिकडे झालं तर बोटात शिवणयंत्राची सुई टोचायची. किंवा शिवत असलेला पातळ कापडाचा तुकडा फाटायचा.

तिला आठवड्याला फक्त सहा डॉलर पगार मिळायचा.

आणि जर सुई तुटली किंवा कापड फाटले गेले तर त्याचे पैसे कापले जायचे.

मिनीच्या कुटुंबियांना तिच्या पगाराची गरज होती.

घराचं भाडं, रोजचं खाणंपिणं ह्यासाठी पैसे लागत.

आपणही आपल्या भावांप्रमाणे शाळेत जावं असं मिनीला खूप वाटायचं.

पण त्यासाठी त्यांच्याकडे पुरेसे पैसे नव्हते.

मिनीचे वडील धक्क्यावर हमाल म्हणून काम करायचे.

आई घरी शिवणकाम करायची.

मिनीही कमवायची. पण तरीही त्यांच्यासारख्या गरीब कुटुंबाला तेवढे पैसे अपुरे पडायचे.





पाच वाजत आले होते.

शिवणयंत्राचा खडखडाट नुकताच थांबला होता.

कामगार घरी परतायच्या तयारीत होते.

तेवढ्यात मिनीने काचेला तडा गेल्याचा आवाज ऐकला.

“आग!” कुणीतरी जोराने ओरडले.

मिनीचे लक्ष वर गेले. ती जोराने किंचाळली.

खिडकीतून आगीचे लोट येत होते.

आग वेगाने पसरत होती.

फरशीवर पडलेल्या कापडाच्या तुकड्यांनी पेट घेतला.

वाटलं होतं त्यापेक्षा मोठी आग होती.

हळू हळू सगळी खोली धुराने भरून गेली.

लोक आगीपासून वाचण्यासाठी सैरावैरा पळू लागले.

परंतु मशिनीच्या रांगांमधली जागा खूप अरुंद असल्यामुळे आणि माणसांची गर्दी असल्यामुळे पुढेही जाता येत नव्हतं.

काही बायकांनी टेबलावरून उडी मारण्याचा प्रयत्न केला.

पण त्या शिवणयंत्रावर आणि कपड्यांना धडकून पडल्या.

लोक एकमेकांना धक्के देत होते, किंचाळत होते.

मिनीचे टेसाकडे पाहिलं. टेसा इतकी घाबरली होती की तिला काय करायचं हेच सुचेना.

मिनीने तिचा हात पकडला आणि ओरडली, “चल, ह्या बाजूने.”

मिनीने टेसाचा हात गच्च पकडला. दोघीनी टेबलाखालून रांगायला सुरुवात केली.


टेसा तिच्या मागोमाग जात होती.

टेबलखुर्च्यांच्या खालून अंग आक्रसून रांगायला त्रास होत होता.

एकदाच्या त्या खोलीच्या भिंतीपर्यंत पोचल्या.

“चल लवकर,” लिफ्टकडे बोट दाखवत मिनी ओरडली.





लिफ्टच्या समोर बायकांनी आधीच गर्दी केली होती.

दार उघडलं की सगळ्यांनाच आत घुसायचं होतं.

दहा माणसं नेण्याची क्षमता असलेल्या लिफ्टमध्ये एकावेळी तीसेक बायकांना घुसताना टेसा आणि मिनीने पाहिलं.

काही लोक इतके घाबरले होते की दुसऱ्या माणसांचा आधार घेण्यसाठी धडपडत होते.

“चल, त्यापेक्षा आपण जिन्याने लवकर पोचू ,” मिनी म्हणाली.

मिनीच्या डोळ्यात आणि नाकातोंडात खूप धूर गेला.

तिला समोरचं काही दिसेनासं झालं.

तेवढ्यात तिला तिच्या पायाशी काहीतरी जळतंय असं वाटलं.

तिने खाली पाहिलं तर काय तिच्या ड्रेसला आग!

ती रडायलाच लागली. पाय झाडत ती हाताने आग विझवायचा प्रयत्न करू लागली.

टेसा मदतीसाठी मोठ्याने हाक मारू लागली.

परंतु त्या आगीच्या गोधळामध्ये कुणालाच तिचा आवाज ऐकू गेला नाही.

मिनीला वाचवायचं तर होतं.

तेवढ्यात तिला भिंतीवरूनतून एक पाण्याची बदली टांगत असलेली दिसली.

तिने ती झटकन ओढली आणि त्यातील पाणी मिनीच्या अंगावर ओतले.

आग लगेच विझली.



“ठीक आहेस न तू?” टेसाने रडतच विचारले.

मिनीच्या डोळ्यातूनही ओघळ वाहत होते तरीही तिने मन हलवून हो म्हटले.

“चल मग पटकन,” टेसा मोठ्याने म्हणाली.

“आपल्याला इथून लवकर बाहेर पडायला हवे.”





जिन्याच्या दारातही लोकांची प्रचंड गर्दी होती.

“दार बंद आहे,” एक बाई रडत म्हणाली.

तिने जोरजोरात दरवाजा ठोठावला.

“आपल्याला त्यांनी आत बंद केलं आहे.”

मिनीला आठवलं की दारावरचा पहारेकरी दिवस संपायच्या काही तास आधी रोज दाराला कुलूप लावायचा.

मालकांनी सक्त ताकीद दिली होती की कुठलाही कामगार वेळेच्या आधी बाहेर पडणार नाही आणि सोबत काही सामान नेणार नाही.

दाराला कुलूप असल्यामुळे कामगार जीव वाचवण्यासाठी बाहेर पडू शकत नव्हते.

आग आणि धूर वाढू लागला.

लोक खोकत होते. अनेकांना श्वास घ्यायला त्रास होत होता.

त्यातील काहींनी खिडकीच्या काचा फोडल्या आणि आगीतून वाचण्यासाठी तिथून खाली उड्या मारल्या.

ते नवव्या मजल्यावर होते. इतक्या वरून उडी मारली तर जीव वाचणं शक्य नाही हे मिनीला माहित होते.

“चल, आपण दुसऱ्या जिन्याने बाहेर पडायचा प्रयत्न करूयात,” टेसा ओरडून म्हणाली.

धुक्यातून रांगतच त्या दुसऱ्या जिन्याकडे गेल्या.

दरवाजा उघडा दिसला. पळत पळत त्या जिन्यावरून उतरल्या.

अचानक त्या दारात आगीचा मोठा लोळ आला.

“पटकन परत फिर, टेसा,” मिनी किंचाळली.

“चाल, छतावर जाऊयात!”

त्या मागे वळल्या आणि जितक्या जोरात पळता येईल तेवढ्या वेगाने त्या जिना चढू लागल्या.

जिन्याच्या पायऱ्या खूप तापल्या होत्या.

धाप लागली म्हणून त्या दम खायला क्षणभर थांबल्या.

तेवढ्यात टेसा खाली कोसळली. मिनीने चटकन तिचा हात पकडला आणि पुढच्या पायऱ्या तिला ओढतच वर नेलं.

मोठ्या कष्टाने एकदाच्या त्या छतावर पोचल्या.





मोकळ्या हवेत आल्यावर मिनी आणि टेसाने भरभरून श्वास घेतला.

“मुलीनो, इकडे या,” कुणीतरी हाक मारली.

आणखीन काही कामगार गच्चीवर पोचले होते.

सगळे इमारतीच्या कडेला थांबले होते.

बाजूलाच एक महाविद्यालय होते.

काही विद्यार्थ्यांनी त्यांच्या गच्चीतून त्यांच्या इमारतीच्या गच्चीमध्ये शिडी टाकली होती.

“पटापट या,” एक विद्यार्थी म्हणाला.

“शिडी चढून या म्हणजे तुम्ही सुरक्षित जागी याल.”

मिनीला खरंतर खूप भीती वाटत होती. पण आगीतून सुटका हवी असेल तर चढून त्या बाजूला जावं लागेल हे तिला कळतं होतं.

विद्यार्थ्यांनी शिडी घट्ट पकडून ठेवली.

गच्चीवरून एका मागोमाग एक सगळे लोक शिडी चढून बाजूच्या इमारतीच्या छतावर पोचले.

शिडी चढताना मिनीचे हात थरथरू लागले.

“खाली नको बघूस,” एका विद्यार्थ्याने ओरडून सांगितलं.

मिनीने डोळे घट्ट मिटून घेतले.

तिला खाली बघायची प्रचंड भीती वाटत होती.

मिनी शिडीला घट्ट पकडून एकेक पायरी सावकाश चढू लागली.

जवळ आल्यावर काही विद्यार्थ्यांनी तिला शिडीवरून उचललं. टेसाही तिच्या पाठोपाठ आली.

त्यानंतर टेसा आणि मिनी त्या विद्यार्थ्यांच्या मागे चालत इमारतीच्या खाली पोचल्या आणि बाहेर पडल्या.





सगळीकडे लोकांची गर्दी झाली होती.

पोलीस बघ्यांची गर्दी पांगवत होते.

रस्त्यावर सगळीकडे शिड्या आणि मोठमोठे पाण्याचे पाईप पसरलेले होते.

अनेक लोक आगीच्या तडाख्यात सापडले होते.

ज्या मुलींनी ९ व्या मजल्याच्या खिडकीतून उड्या मारल्या होत्या त्या दुर्दैवाने वाचू शकल्या नाही.

तेवढ्यात टेसाचा तोल गेला म्हणून तिने झटकन मिनीचा हात पकडला.

“काय होतंय, टेसा?” मिनीने विचारलं.

“जिना चढताना माझ्या घोट्याला लागलं, टेसा म्हणाली.

तिचे डोळे डबडबले होते.

“त्यावेळी मला लक्षात नाही आलं, पण आता मला एक पाऊलही पुढे टाकवत नाही आहे. मी घरी कशी जाणार, मिनी?”

मिनी तिच्या शेजारी बसली.

“तू मुळीच काळजी करू नकोस, टेसा. मी तुला घरापर्यंत घेऊन येईन.”

खरंतर मिनीही काळजीत पडली होती.

टेसाला घरापर्यंत उचलून नेणं तिला एकटीला शक्य नव्हतं.



तेवढ्यात ‘मिनी’ ‘मिनी’ अशा हाका मिनीच्या कानावर पडल्या.

तिने वर पहिले तर तिचे बाबा होते.

त्यांनी मिनीला उठवलं आणि घट्ट मिठी मारली.

त्यांनी जवळ घेतल्यावर तिला रडू आलं.

किती सुरक्षित वाटत होतं त्यांच्या मिठीत.

“बाबा, मला खूप भीती वाटतेय,” मिनी म्हणाली.

त्यांनी तिच्या केसातून, चेहऱ्यावरून मायेने हात फिरवला.

“आता मी आलो आहे ना. सगळं ठीक होईल,” ते म्हणाले.

“मी पळतच निघालो. मला तुझी खूप काळजी वाटत होती. चल, आता घरी जाऊयात.”





“मी माझ्या मैत्रिणीला टेसाला इथे सोडून नाही येऊ शकत, बाबा. तिला चालता येत नाहीये.

तिच्या घरी मलबेरी स्ट्रीटला सोडेन असं कबूल केलं आहे मी तिला.”

मिनीने बाबांकडे पाहिलं.

ते रागावतील हे तिला माहित होतं.

त्यांनी तिला इटालियन शेजाऱ्यांकडे जायचं नाही असं अनेकवेळा बजावून सांगितलं होतं. तसंच कामाच्या ठिकाणी कुठल्याही कॅथोलिक व्यक्तीशी बोलायचं नाही हेही सांगितलं होतं.

बाबांच्या डोक्यावर आठ्या पडल्या.

“हे बघ मिनी, “ ते म्हणाले. “मला खात्री आहे की ह्या मुलीला मदत करायला तिचे जवळचे लोक नक्की येतील.”

“नाही बाबा,” मिनी म्हणाली.

“टेसा माझी मैत्रीण आहे. तिने माझा जीव वाचवला आहे. माझ्या ड्रेसला लागलेली आग तिने विझवली.

प्लीज बाबा.

तिला आपल्या मदतीची गरज आहे.”

“ह्या इटालियन मुलीने तुझा जीव वाचवला?” त्यांनी विचारले.

“हो बाबा,” मिनी म्हणाली.

त्यावर ते काहीच बोलले नाही.

त्यांनी टेसाकडे रोखून पहिले.

टेसानेही त्यांच्याकडे पाहिलं आणि हसली.

मग तिने हात वर केला.

“तुम्हाला भेटून खूप आनंद झाला, सर,”

थोडी संकोचत ती म्हणाली.

“माझं नाव टेसा मोनेट्टी.”

मिनीने बाबाकडे पाहिलं. त्यांच्या डोक्यावरच्या आठ्या हळहळू कमी होत होत्या.

त्यांनी खाली वाकून टेसाचा हात हातात घेतला.



“मिस मोनेट्टी, माझ्या मिनीला वाचवल्याबद्दल मी तुझा खूप खूप आभारी आहे,” ते म्हणाले.

“चल, तुला घरापर्यंत सोडतो आम्ही.”

“माझ्यामुळे तुम्हाला काही त्रास तर नाही ना होणार?” टेसा म्हणाली.

“छे छे, त्यात कसला आला त्रास,” ते उत्तरले.

“मिनीच्या मैत्रिणीला मदत करायला मला आवडेल.”

मग बाबांनी खाली वाकून हळुवार टेसाला उचलले.

आणि ते घराच्या दिशेने चालू लागले.





समारोप

अर्ध्या तासाच्या आत ट्रँगल शर्टवाईस्ट फॅक्टरीतील १४६ कामगार आगीमुळे मृत्यूमुखी पडले. त्यात काही १४ वर्षांपेक्षा लहान मुलेही होती. बरेचजण आगीत होरपळून आणि धुराने कोंडल्यामुळे गेले. ४० पेक्षा जास्त लोकांनी आठव्या आणि नवव्या मजल्यावरून उड्या मारल्या. एवढ्या उंचावरून उडी मारल्याने दुखापत होऊन ते जागच्या जागी गेले.

ह्या घटनेने लोक संतप्त झाले. आग लागल्यावर कामगारांना बाहेर पडायला काहीच कशी सोय नव्हती? दारं का बंद होती? इतके लोक कसे काय मरण पावले? लोक भडकले. परंतु त्यानंतर झालेल्या चौकशीमध्ये फॅक्टरीचे मालक निर्दोष सुटले.ट्रँगल फॅक्टरीमध्ये त्यावेळी अस्तित्वात असलेल्या कायद्यानुसार सुरक्षिततेच्या सगळ्या नियमाचे पालन केले होते.

त्यामुळे हे स्पष्ट झाले की कायद्यात बदल करणे आवश्यक होते. आता फॅक्टरीमध्ये फायर अलार्म, बाहेर पडण्यासाठी जास्तीचे मार्ग, फायर एस्केप तसेच आग लागली तर त्यावर आॅटोमॅटिक पाण्याचे फवारे उडतील अशी सिस्टीम असणे बंधनकारक आहे. आग लागल्यावर काय करावे ह्यासाठी फायर ड्रील घेतली जाते. ह्यामुळे फॅक्टरीना आग लागणे पूर्णत: बंद होईल असे नाही पण ट्रँगल फॅक्टरीत जसे आगीमुळे खूप लोक मृत्युमुखी पडले तसे तरी निदान पुन्हा होणार नाही.